# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयकुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१५०** **दिनांक - १९/०४/२०२४**

## अनोळखी इसमास ट्रकने ठोकर मारुन अंधाराचा फायदा घेऊन ट्रकसह फरार झालेल्या आरोपीतास अटक करण्यास पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १६/०४/२०२४ रोजी पहाटे ०४.०० वा. चे सुमारास संस्कृती हॉस्टीटलचे जवळ, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वर ता. वसई जि. पालघर येथे एक अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे यास कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगात वाहन चालवुन ठोकर मारल्याने सदर इसमाच्या डोक्याचा, उजव्या हाताचा पुर्ण चेंदा मेंदा होवुन, डाव्या हातावर गंभीर जखमा होवुन, पोटावर, छातीवर किरकोळ जखमा होऊन त्याच्या मरणास कारणीभुत झाला असुन सदर वाहनचालक याने मयत यास दवाउपचाराकरीता न नेता तसेच अपघाताची खबर न देता फरार झाला होता. सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे अज्ञात वाहन चालकाविरोधात गु.र.क्र. I ४१०/२००४, भा.दं.वि.सं ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मोटार वाहन अधिनियम कलम १८४, १८७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर गुन्हयातील अज्ञात वाहनाचा व त्यावरील चालकाचा शोध घेणेबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना सुचना देऊन आदेशित केले होते.

सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी घटनास्थळाचे परिसरातील सुमारे ५० ते ६० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन तांत्रिक बाबीचा बारकाईने आभ्यास करुन सदर गुन्हयातील मयत इसमास ठोकर मारुन फरार झालेल्या वाहनाचा शोध घेतला असता मयत यास ट्रक क्र. जी.जे.१५ एटी २५९७ या वाहनाने ठोकर मारली असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर ट्रक वरील चालक सुरजित स्वरण सिंग, वय ५९ वर्षे, रा. जि. गुरदासपुर राज्य पंजाब यास सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सा़ो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सा़ो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सा़ो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, निखील मंडलिक, संजय मासाळ, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.